## निशाणी क्र.1 खाली आदेश

अर्जदार यांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा 1827 मधील तरतुदीप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केला आहे.

2. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.1 व 2 ची बहिण व अर्जदार क्र.3 वी मुलगी नामे सिमा मोतीलाल चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी ही दिनांक 03/01/2005 रोजी मौजे. चाळीसगांव, जि.जळगांव येथे खाजगी हॉस्पिटलमध्ये डिलीव्हरी होत असतांना अकस्मात मयत झालेली असुन मयतास कोणतेही मुळबाळ झालेले नाही.

3. तसेच मयत सिमा मोतीलाल चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी ही विवाहीत होती. परंतु ती मयत झाल्यानंतर तिचा पती नामे हिंमत चौधरी यांनी काही ठरावीक कालावधीतच दुसरे लग्न केलेले आहे. त्यामुळे मयत सिमा मोतीलाल चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी हिस तिची आई अर्जदार क्र.3 व दोन भाउ अर्जदार क्र. 1 व 2 असे एकुण तिन कायदेशिर वारस असून तिचे वडील हे यापुर्वीच मयत झालेले आहेत.

4. मयत सिमा मोतीलाल चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी ही घरकाम करीत होती. तिच्या मृत्युनंतर तिच्या नावाने मिळणा–या शासकिय व निमशासकीय योजनांचे लाभाकरीता सदर अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे. मयत सिमा मोतीलाल चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी हीने हयात असतांना कोणतेही मृत्युपत्र केलेले नाही.

5. अर्जदारांनी निशाणी क्र.03 सोबत अर्जदार क्र.1 च्या बहिणीचे मृत्युप्रमाणपत्राची पडताळीत प्रत दाखल केली आहे. तसेच अर्जदार क्र.1 ते 3 यांचे आधारकार्डच्या व्हेरीफाईड प्रती, तसेच निशाणी क्र.11 खाली अर्जदार क्र.1 यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र, निशाणी क्र.09 खाली अर्जदाराने दिनांक 30/11/2022 रोजी दैनिक लोकशाही या वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रगटन प्रसिध्द केले असून ते निशाणी क्र.10 वर आहे. सदर जाहिर प्रगटनास व या अर्जास कुणीही हरकत घेतलेली नाही.

6. अर्जदाराने त्यांचे कथन शाबीत करण्यासाठी अर्जदार यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.11 वर दाखल करून अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. तसेच अर्जदाराचे साक्षीदार हिंमत तुकाराम चौधरी हे मयताचे पती असून त्यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.13 वर दाखल करून त्यात त्यांनी अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली व साक्षीदाराने त्यांची पत्नी मयत झाल्यानंतर लगेचच दुसरे लग्न केलेले आहे. अर्जदार यांनी सदरच्या प्रकरणामध्ये इतर कोणताही पुरावा देणे नाही. याकरीताची पुरशीस निशाणी क्र.14 वर दाखल केली आहे. सदरच्या वरील दाखल उपलब्ध सर्व कागदपत्रांवरून, कथनांवरून अर्जदार व अर्जातील नमुद सर्व वारस हे मयत सिमा मोतीलाल चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी यांचे कायदेशिर वारस असल्याचे दिसुन येते.

7. अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील कथनावरून असे दिसुन येते की, अर्जदार याने सदरचा अर्ज Bombay Regulation VIII of 1827 मधील नियम 1 व 2 प्रमाणे अर्जदार हे मयत सिमा मोतीलाल चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी यांचे (Formally Recognized Heirs) औपचारीक ओळख दर्शविण्यासाठी वारस म्हणुन घोषित होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा मयताचे पश्चात शासकिय कार्यालयीन कामकाजासाठी मयताचे कायदेशिर वारसदार नात्याने वारस प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे दाखल केला आहे.

8. सबब वर केलेल्या चर्चेवरून, अर्जातील कथनावरून आणि अर्जदार याने अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रावरून Bombay Regulation VIII of 1827 मधील नियम 1 व 2 तसेच नियम 7 भाग 2 मधील तरतुदीवरून मी या निष्कर्षापर्यंत आले आहे की, अर्जदार व अर्जात नमुद वारस हे मयत सिमा मोतीलाल चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी यांचे (Formally Recognized Heirs) औपचारीक ओळख दर्शविण्यासाठी वारस म्हणुन घोषित होवुन मिळण्यास पात्र आहेत. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्जदार क्र.1 मनोज मोतीलाल चौधरी, अर्जदार क्र.2 रामेश्वर मोतीलाल चौधरी, अर्जदार क्र.3 उषाबाई मोतीलाल चौधरी, हे मयत सिमा मोतीलाल

चौधरी उर्फ सिमाबाई हिंमत चौधरी यांचे (Formally Recognized Heirs) औपचारीक ओळख दर्शविण्यासाठी वारस असून त्यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

सही / —
(श्रीमती.एस.एस.चव्हाण)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भडगांव

दिनांक : 19 / 01 / 2023